**किरकोळ अर्ज क्र.२६९/२०१९**

**निशाणी १ वर आदेश**
(दि.११.१२.२०२५)

आज रोजी सदरचे प्रकरण म्हणणे दाखल करण्यासाठी नेमले आहे. अर्जदार अस्मीता हजर, सामनेवाला आशिष हजर, अर्जदाराची आई मंजूळा आष्टूरकर हजर. अर्जदाराने निशाणी ५५ कडे पुरसिस दाखल करून दि.१३.१०.२०२५ रोजी मुलीचा ताबा स्वखुशीने सामनेवालाकडे दिला आहे. सामनेवाला व त्याचे वकील श्री. कुकवास मुलगी परी सोबत न्यायालयात हजर झाले असता अर्जदाराने न्यायालयासमोर न्यायादान कक्षात, “मी आज मुलीला घेउन जाणार” असे म्हणून दंगा केला. त्यावर न्यायालयाने न्यायादान कक्षात अश्या स्वरूपाचे कृत्ये करू नये अशी समज देउन पुन्हा असे कृत्य झाल्यास योग्य ती कारवाई केली जाईल असे सांगितल्यानंतर अर्जदार शांत झाले. मुलगीला घेउन जाण्यासाठी अर्जदाराची आई तिला मदत करत होती.

या सर्व घटनेचे गांभिर्य पाहता तसेच निशाणी ५५ कडील पुरसिस प्रमाणे अर्जदाराने मुलगीचा ताबा स्वखुशीने सामनेवाला कडे दिला असल्याने तसेच आज सामनेवाला यांनी मुलगीला न्यायालयात आणले असल्याने दोन्ही पक्षकारांना मुलीच्या ताब्याबाबत योग्य त्या कायदेशीर तरतुदीअंतर्गत कारवाई करण्याची सुचना देउन प्रकरणात पुढील तारीख देण्यात आली व न्यायालयाच्या आवारात कोणतेही फौजदारी पात्र कृत्य किंवा दंगा होणार नाही याची खबरदारी घ्यावी याची सुचना देण्यात आली.

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.12.11 17:36:39 +0530

(मोहन आर. कामत)
प्रथम न्यायदंडाधिकारी, वर्ग १,
कामठी.

दि.११.१२.२०२५